दै. पुण्य नगरी दि. 19.02.2020

# शेख यांचा प्रामाणिकपणा

पुण्य नगरी 19.02.20



**नांदेड/ प्रतिनिधी**

शहरातील आयटीआय चौकात वाहतूक पोलिसाला सापडलेल्या पाकिटातील रक्कम पोलीस अधीक्षकांना सुपूर्द करुन जमादार शेख अब्दुल अमीर यांनी प्रामाणिकपणाचा प्रत्यय आणून दिला आहे.

शहर वाहतूक शाखेचे जमादार शेख अब्दुल अमीर हे १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते ९ दरम्यान आयटीआय चौक नांदेड येथे वाहतूक सुरळीत करीत होते. तेव्हा त्यांना रस्त्यावर पडलेले एक पाकिट सापडले. या पाकिटावरुन ये जा करणारी वाहने जात होती. शेख यांचे लक्ष त्या पाकिटावर गेले. त्यांनी हे पाकिट उचलून बाजूला जाऊन उघडले असता त्यात १४ हजार ९९१ रुपये व ज्योती शाम लोखंडे यांच्या नावे असलेले स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम कार्ड आढळून आले. त्यांनी ते पाकिट पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांच्याकडे जमा केले. मगर यांनी त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच २ हजार रुपयांचे बक्षीस त्यांनी जाहीर केले. संबंधीतांनी ओळख पटवून पोलीस अधीक्षक कार्यालयातून सदर रक्कम व एटीएम कार्ड घेऊन जावे असे आवाहन करण्यात आले आहे.